नि. फौ. ख. क्र. १६५/२०१८ निशाणी ४०

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – कुसुमबाई शालीग्राम शिरसाठ

वय – ६५ वर्षे, व्यवसाय – घरकाम

पत्ता – बायपास, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस.व्ही.इंगळे यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. फिर्यादी सरला माझी मुलगी आहे. तिचे लग्न आरोपी क्र. १ राहुल तेलगोटे सोबत अंदाजे १५–१६ वर्षापुर्वी झाले. सदर लग्नसंबंधापासुन तिला ३ अपत्ये आहेत. माझ्या मुलीने आरोपीविरुध्द मारहाण करण्याचा रिपोर्ट दिला. इतर आरोपींच्या सांगण्यावरुन आरोपी क्र. १ माझ्या मुलीला चारित्र्यावर संशय घेवुन मारहाण करित असे. आरोपी माझ्या मुलीला तिच्या मुलांना भेटु देत नव्हते, माझे नातु आरोपी यांच्याकडे राहावयास आहेत. बाळापूर पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिल्यानंतर माझ्या मुलीची केस महिला मंडळ, अकोला येथे चालली. महिला मंडळात आरोपींनी लिहुन दिले होते की, ते माझ्या मुलीला त्रास देणार नाही, मारहाण करणार नाही, तुम्ही नांदवायला पाठवा. नांदायला पाठिल्यानंतर त्यांनी माझ्या मुलीला त्रास देणे सुरु ठेवले. माझ्या मुलीला अंदाजे ७–८ वर्षापुर्वी आरोपींनी मारहाण केली होती. मारहाण झाल्यानंतर माचा भाचा सुनिल गवई आणि माझा नातु अक्षय सुरवाडे माझ्या मुलीला घ्यायला गेले होते. तेव्हापासुन ते आजपर्यंत माझी मुलगी आमच्यासोबत तिच्या माहेरी राहते.आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.टी.इंगळे यांच्या मार्फत सुरु–**

२. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीला २ मुले होईपर्यंत तिचा संसार सुखाचा सुरु होता आणि तिचे येणे-जाणे माहेरी सुरु होते. हे म्हणणे खरे नाही की, ती जेव्हा जेव्हा माहेरी येत होती, तेव्हा ती सुखात आहे अशी सांगत होती. मला लिहिता वाचता येत नाही, मला तारखा समजत नाही. पोलीसांनी माझे बयान घेतले होते. मी

पोलीसांना माझे बयान नोंदवितांना तारिख, वर्ष व महिना सांगितला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलगी सन २०१८ मध्ये स्वेच्छेने माहेरी आली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ माझ्या मुलील तिच्या इच्छेप्रमाणे वागु देत नव्हता म्हणुन त्यांचेत वाद होत होते. हे म्हणणे खरे नाही की, म्हणुन माझ्या मुलीने सर्व आरोपींच्या विरुध्द रिपोर्ट दिला. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2024.12.06 11:11:23 +0530

बाळापूर.
दि. ०५/१२/२०२४

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर